निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर

पाने : ४

किंमत : २.००

वर्ष : १५ वे

अंक : २१७ वा.

शुक्रवार -१० ऑक्टोबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247


# भारत-ब्रिटन भागीदारी जागतिक स्थैर्य आणि आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा आधार - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी



## -प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांचे संयुक्त निवेदन

## - व्यापार, तंत्रज्ञान, शिक्षण आणि संरक्षण क्षेत्रात अभूतपूर्व संधी

**मुंबई**/ भारत आणि ब्रिटन वेगवेगळ्या क्षेत्रात नैसर्गिक भागीदार आहेत. या संबंधांना लोकशाही, स्वातंत्र्य आणि कायद्याचे राज्य यासारख्या मूल्यांवरचा परस्पर सामायिक विश्वास आहे. सध्याच्या जागतिक अस्थिरतेच्या काळात, भारत आणि ब्रिटन दरम्यानची ही वाढती भागीदारी जागतिक स्थैर्य आणि आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा आधार ठरली आहे. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही देशांतील संबंध अधिक दृढ झाले असून, व्यापार, तंत्रज्ञान, शिक्षण आणि संरक्षण क्षेत्रात अभूतपूर्व संधी निर्माण झाल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर हे दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत. मुंबईतील राजभवन येथे आज त्यांची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा झाली. या चर्चेनंतर नरेंद्र मोदी व कीर स्टार्मर यांनी संयुक्त निवेदन जारी केले. त्यावेळी प्रधानमंत्री मोदी बोलत होते.

प्रधानमंत्री मोदी म्हणाले, यावर्षी जुलै महिन्यात माझ्या ब्रिटन दौऱ्यादरम्यान ऐतिहासिक सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करारावर (उएढ-) सहमती दर्शविली. या करारामुळे व्यापार आणि रोजगार निर्मिती वाढेल आणि ग्राहक तसेच उद्योग क्षेत्र दोघांनाही लाभ मिळेल. ब्रिटनचे पंतप्रधान आणि त्यांच्यासोबत आलेले आतापर्यंतचे सर्वात मोठे व्यावसायिक प्रतिनिधी मंडळ ही भागीदारीतील नव्या ऊर्जेचे द्योतक असल्याचे प्रधानमंत्री मोदी यांनी यावेळी सांगितले. दोन्ही देशांतील उद्योगक्षेत्रातील प्रतिनिधींची शिखर परिषद, सीईओ मंच आणि जागतिक फिनटेक महोत्सव यांच्या माध्यमातून सहकार्याच्या नव्या शक्यता समोर आल्याचेही त्यांनी नमूद केले.

प्रधानमंत्री मोदी म्हणाले, आजच्या बैठकीत दोन्ही नेत्यांमध्ये इंडो-पॅसिफिक आणि पश्चिम आशियातील स्थैर्य, तसेच युक्रेनमध्ये सुरू असलेल्या संघर्षावरही विचारांची देवाणघेवाण झाली. युक्रेन आणि गाझाच्या मुद्द्यावर भारत संवाद आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून शांतता पुनप्रस्थापित करण्यासाठीच्या सर्व प्रयत्नाचे समर्थन करतो. इंडो पॅसिफिक क्षेत्रात सागरी सुरक्षा विषयक सहकार्य वाढविण्यासाठी वचनबद्ध असल्याचे प्रधानमंत्री मोदी यांनी यावेळी सांगितले.

**भारत-ब्रिटन तंत्रज्ञान सुरक्षा उपक्रमातून नवोन्मेषाला चालना**

तंत्रज्ञान क्षेत्रात दोन्ही देशांमध्ये अमर्याद सहकार्याची क्षमता असल्याचे सांगत प्रधानमंत्री मोदी म्हणाले, आम्ही ब्रिटनची औद्योगिक तज्ञता आणि संशोधन क्षमता भारताच्या प्रतिभा व व्याप्तीशी जोडत आहोत. गेल्या वर्षी सुरू केलेल्या भारत-ब्रिटन तंत्रज्ञान सुरक्षा उपक्रमातून नवोन्मेषाला चालना मिळत आहे. खनिज क्षेत्रातील सहयोगासाठी नवीन उद्योग संघ स्थापन केला जात असून त्याचा सॅटेलाईट कँपस आयएसएम धनबाद येथे असणार आहे, अशी माहितीही प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी दिली. शाश्वत विकासासाठी दोन्ही देशांनी भारत-युके ऑफशोअर विंड टास्कफोर्स आणि हवामान तंत्रज्ञान स्टार्टअप निधी स्थापन केल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री मोदी म्हणाले, ब्रिटनमधील नऊ विद्यापीठे भारतात त्यांचे कॅम्पस सुरू करत आहेत. साऊदम्टन विद्यापीठाच्या गुरूग्राम कॅम्पसचे उद्घाटन झाले असून, गिफ्ट सिटीमध्ये आणखी तीन विद्यापीठांच्या शाखा उभारल्या जात आहेत.

**भारत आणि युके यांच्यातील संरक्षण सहकार्य अधिक बळकट**

भारत आणि युके यांच्यातील संरक्षण सहकार्य अधिक बळकट होत असून, दोन्ही देश संयुक्त उत्पादनाच्या दिशेने पावले टाकत आहेत. याशिवाय, दोन्ही देशांच्या सैन्यदलांमध्ये सैन्य प्रशिक्षण सहकार्य करार झालेला असून, त्याअंतर्गत भारतीय वायुसेनेचे उड्डाण प्रशिक्षक आता युकेच्या रॉयल एअरफोर्समध्ये प्रशिक्षक म्हणून काम करणार आहेत. मुंबईत बैठक चालू असताना, आपल्या नौदलांची जहाजे 'कोंकण २०२५' हा संयुक्त सराव करत आहेत. हा आमच्या मजबूत सामरिक सहकार्याचा पुरावा असल्याचे प्रधानमंत्री मोदी यांनी नमूद केले.

युकेमध्ये वास्तव्यास असलेले १८ लाख भारतीय हे दोन्ही देशांमधील मैत्रीचे जिवंत उदाहरण आहे. त्यांनी ब्रिटिश समाज आणि अर्थव्यवस्थेत दिलेले योगदान अत्यंत मोलाचे असून दोन्ही देशांतील मैत्री आणि विकासाच्या पुलाला बळकटी दिली आहे, असेही प्रधानमंत्री मोदी यांनी यावेळी सांगितले.

भारताची गतिशीलता आणि युकेची तज्ञता मिळून एक अद्वितीय सुसंवाद निर्माण होतो. आमची भागीदारी प्रतिभा, तंत्रज्ञान आणि विश्वासावर उभी आहे. आम्ही दोन्ही देशांच्या लोकांसाठी उज्ज्वल भविष्य घडवू, असा विश्वास प्रधानमंत्री मोदी यांनी यावेळी व्यक्त केला.

**भारत-युके भागीदारीचा नवा अध्याय : मानवी नात्यांचा**

**सेतू अधिक मजबूत करण्याची वचनबद्धता - ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर**

भारत आणि ब्रिटन यांच्यातील मानवी बंध हेच या नात्याचे खरे वैशिष्ट्य आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितल्याप्रमाणे, हे दोन देशांदरम्यानचे, लोकांदरम्यानचा, मनांदरम्यानचा जिवंत पूल आहे, असे ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी आज मुंबईत आयोजित द्विपक्षीय बैठकीनंतर जारी केलेल्या संयुक्त निवेदनादरम्यान सांगितले.

कीर स्टार्मर म्हणाले, भारत-युके एकत्र येऊन आधुनिक आणि भविष्याभिमुख भागीदारी निर्माण करत आहेत. यामुळे दोन्ही देशांच्या नागरिकांसाठी नव्या संधी निर्माण होतील. युके-भारत सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार (उएढ-) पूर्ण करणे हा ऐतिहासिक टप्पा आहे. या करारामुळे आयात शुल्क कमी होईल, बाजारपेठांमध्ये अधिक प्रवेश मिळेल, रोजगारनिर्मिती होईल आणि दोन्ही देशांतील जनतेचे जीवनमान उंचावणार आहे. कराराच्या आर्थिक लाभांपलीकडे जाऊन, या प्रक्रियेत निर्माण झालेला आत्मविश्वास आणि परस्पर सहकार्याचा भाव हे भारत-युके संबंध अधिक दृढ करत असल्याचेही कीर स्टार्मर यांनी नमूद केले.

ही बैठक भारताची आर्थिक राजधानी मुंबईत होत आहे, हे प्रतीकात्मक आहे. भारताची आर्थिक प्रगती विलक्षण आहे. २०२८ पर्यंत जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याचे उद्दिष्ट आणि 'विकसित भारत २०४७' या दृष्टिकोनाबद्दल मी प्रधानमंत्री मोदी यांचे अभिनंदन करतो. या प्रवासात आम्ही भारताचे भागीदार व्हावे, ही आमची इच्छा आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

या भेटीदरम्यान भारत-युके व्यापार कराराच्या संधींना वास्तवात आणण्यासाठी ब्रिटनकडून १२६ कंपन्यांचे सर्वात मोठे व्यावसायिक प्रतिनिधीमंडळ भारतात आले असल्याची माहिती त्यांनी दिली.

कीर स्टार्मर म्हणाले, युके आणि भारत हे तंत्रज्ञान आणि नवोन्मेष क्षेत्रातील आघाडीचे देश आहेत. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता, प्रगत संवाद व्यवस्था, संरक्षण तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांमध्ये सहकार्य अधिक मजबूत करण्याचा आमचा संकल्प आहे.

बॉलीवूड चित्रपटांचे चित्रीकरण युकेमध्ये करण्यासाठी करार जाहीर करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. शिक्षण क्षेत्रात भागीदारी वाढवण्याच्या दृष्टीने सर्व ब्रिटिश विद्यापीठे भारतामध्ये आपले कॅम्पस सुरू करणार असल्याची घोषणा त्यांनी केली. यामुळे ब्रिटन भारताचा अग्रगण्य आंतरराष्ट्रीय शिक्षण भागीदार बनेल आणि व्हिजन २०३५ ला मूर्त रूप मिळेल, असेही ते म्हणाले.

# 'लाडक्या बहिणीं'ना पैसे देण्यासाठी ४१०००००००० चा निधी वळवला; कोणाला बसणार फटका?



लाडकी बहीण योजनेसंदर्भातील मोठी बातमी समोर आलीय. लाडकी बहीण योजना चालवणे राज्य सरकारसाठी डोईजड जातेय का? असा प्रश्न उभा पाहतोय. यामागे कारणही तसंच आहे. लाडक्या बहिणींना पैसे देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवण्याचा प्रकार समोर आला होता. यावर संजय शिरसाट यांनी नाराजीदेखील व्यक्त केली होती. असा प्रकार पुन्हा घडल्याचे पाहायला मिळतंय. काय घडलंय नेमकं? सविस्तर जाणून घेऊया. महायुती सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी सप्टेंबर २०२५ च्या हप्त्यासाठी सामाजिक न्याय विभागाचा ४१०.३० कोटी रुपयांचा निधी वळवण्यात आला आहे. यामुळे सामाजिक न्याय विभागाच्या योजनांसाठी आर्थिक ताण निर्माण होण्याची शक्यता आहे. परिणामी, या विभागाला आपल्या योजनांसाठी निधी वापरताना काटकसर करावी लागेल. सरकारने यासंदर्भात बुधवारी शासन निर्णय जाहीर करून लाडकी बहीण योजनेसाठी ३९६० कोटी रुपये मंजूर केले आहेत.

**सामाजिक न्याय विभागाच्या योजनांवर परिणाम**- सामाजिक न्याय विभागांतर्गत संजय गांधी निराधार योजना आणि श्रावण बाळ सेवा निवृत्तीवेतन योजनेसारख्या योजनांचा लाभ घेणाऱ्या अनुसूचित जाती (डउ) आणि नवबौद्ध प्रवर्गातील लाभार्थ्यांना लाडकी बहीण योजनेचा हप्ता मिळणार नाही, याची खबरदारी प्रशासन घेणार आहे. उपलब्ध निधी केवळ या प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठीच वापरला जाईल, अशी सूचना महिला व बालकल्याण खात्याने दिली आहे.

**लाडकी बहीण योजनेची सद्यस्थिती काय?**

जुलै २०२४ मध्ये सुरू झालेल्या या योजने अंतर्गत ऑगस्ट २०२५ पर्यंत लाभार्थ्यांना १४ हप्त्यांचे वितरण झाले आहे. सप्टेंबरच्या हप्त्यासाठी निधी वळवल्यानंतर लवकरच १५०० रुपये लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होण्याची शक्यता आहे.

**लाभार्थ्यांची संख्या घटणार** - लाडकी बहीण योजनेसाठी कठोर निकष लागू करण्यात आल्याने पात्र लाभार्थ्यांची संख्या कमी होत आहे. ई-केवायसी प्रक्रियेद्वारे कुटुंबाचे उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी आहे की नाही, याची तपासणी केली जात आहे. यासाठी लाभार्थी महिलांच्या वडील आणि पती यांच्या उत्पन्नाची पडताळणी सुरु आहे.

**आर्थिक नियोजनावर प्रश्नचिन्ह**- सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवल्याने या विभागाच्या योजनांवर परिणाम होऊ शकतो. सरकारला आता योजनांचे आर्थिक नियोजन काळजीपूर्वक करावे लागेल, जेणेकरून सामाजिक न्याय आणि लाडकी बहीण योजना यांचा समतोल राखला जाईल

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र अकोल्यात स्थापण्यासाठी समिती नेमावी - उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील



**मुंबई,**/ संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र अकोला येथे सुरू करण्याच्या कार्यवाहीसाठी तीन सदस्यीय समिती नेमावी. या समितीने उपकेंद्रासाठी योग्य जागेची पाहणी करून सविस्तर आराखडा सादर करावा, असे निर्देश सूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले.

मंत्रालयात उच्च व तंत्रशिक्षण विभागाची बैठक झाली. राज्यमंत्री इंद्रनील नाईक, आमदार रणधीर सावरकर, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे, उपसचिव प्रताप लुबाळ, महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचे संचालक विनोद दांडगे, सहसचिव संतोष खोरगडे, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्र-कुलगुरू, विद्यापीठाचे रजिस्ट्रार तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर दुरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

जे.जे.कला महाकवद्यालयात आर्ट म्युझियम उभारावे

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट ही महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख आहे. येथील कलाकृती पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित राहाव्यात, याकरिता आधुनिक सुविधांसह आर्ट म्युझियम उभारावे.

यावेळी सर जे. जे. कला महाविद्यालयाच्या समृद्ध कलावैभवाचे जतन, संवर्धन आणि प्रदर्शनासाठी आधुनिक तंत्रज्ञानयुक्त आर्ट गॅलरी उभारण्याच्या आराखड्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या गॅलरीत संस्थेतील ऐतिहासिक व दुर्मिळ कलाकृतींचे डिजिटल दस्तऐवजीकरण, विद्यार्थ्यांसाठी संशोधन व अभ्यासासाठी खुले प्रदर्शन विभाग, तसेच आधुनिक कलाप्रदर्शनासाठी स्वतंत्र दालन उभारण्याबाबतही चर्चा झाली.

बैठकीस तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर, सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे प्राचार्य राजीव मिश्रा, महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचे संचालक विनोद दांडगे, सहसचिव संतोष खोरगडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई नियामक परिषदेचे पाचवी बैठक झाली. या बैठकीत अकोला जिल्ह्यातील पातूर येथील महात्मा फुले कला विज्ञान महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत आढावा घेण्यात आला.

# स्पष्ट दृष्टिकोन, जलद निर्णय आणि जबाबदार अंमलबजावणी महाराष्ट्राच्या विकासाचे तीन स्तंभ - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई**/ राज्याच्या सर्व प्रकल्पांच्या अंमलबजावणीत स्पष्ट दृष्टिकोन, जलद निर्णयप्रक्रिया आणि जबाबदार अंमलबजावणी हे तीन महत्त्वपूर्ण स्तंभ आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. जिओ वर्ल्ड सेंटर येथे आयोजित ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२५ च्या कार्यक्रमामध्ये क्रेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल शाह यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुलाखत घेतली, त्यावेळी ते बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुंबई ट्रान्स हार्बर लिंकसारखे विविध प्रकल्प अनेक दशके प्रलंबित होते, परंतु 'इन्फ्रास्ट्रक्चर वॉर रूम'च्या माध्यमातून निर्णयप्रक्रिया गतिमान करण्यात आली. पूर्वी मुंबई मेट्रोच्या पहिल्या टप्प्याला केवळ नियोजनासाठी सहा वर्षे लागली होती. मात्र आम्ही ३७२ किमी मेट्रो नेटवर्कसाठी केवळ ११ महिन्यांत निविदा टप्प्यापर्यंत पोहोचलो.

सन २०३० पर्यंत महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनविण्याचे आमचे ध्येय आहे. त्यासाठी 'एमएमआर ग्रोथ हब इनिशिएटिव्ह'च्या माध्यमातून मुंबई महानगर प्रदेशाला १.५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनविण्याचे उद्दिष्ट असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

नवी मुंबई परिसरात 'तिसरी मुंबई'ची उभारणी करण्यात येणार असून त्यात 'एज्यु सिटी', 'इनोव्हेशन सिटी', 'स्पोर्ट्स सिटी' आणि 'जीसीसी सिटी' उभारण्यात येणार आहे. 'एज्यु सिटी'त १० ते १२ परदेशी विद्यापीठांचे कॅम्पस येणार असून १ लाख विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळेल. या विद्यापीठांमध्ये जागतिक दर्जाच्या संस्था असणार आहेत. यामुळे नव्या शहराचा आणि नव्या अर्थव्यवस्थेचा विकास होणार असल्याचे ते म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, इनोव्हेशन सिटीमध्ये जागतिक स्तरावरील संशोधन व तंत्रज्ञानावर आधारित उद्योगांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. टाटा सन्सचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांनी या प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यासाठी पुढाकार घेतला असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुंबईच्या उत्तरेकडील भागात वाढवण येथे भारतातील सर्वात मोठा बंदर प्रकल्प उभारला जात आहे. २० मीटर खोल ड्राफ्ट असलेले हे बंदर जगातील पहिल्या दहा बंदरांमध्ये गणले जाणार आहे. याशिवाय, ऑफशोर विमानतळ आणि बुलेट ट्रेन स्टेशनही प्रस्तावित आहे. या प्रकल्पांमुळे मुंबई नवीन आर्थिक केंद्र म्हणून उदयास येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

तंत्रज्ञानाच्या वापराबाबत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान राज्यातील सर्व क्षेत्रांमध्ये परिवर्तन घडवत आहे. राज्य सरकारने शेती क्षेत्रासाठी ५०० कोटी रुपयांचे '-ख मिशन' हाती घेतले असून, शेतकऱ्यांसाठी मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत एआय चॅटबॉट विकसित करण्यात आले आहे. हवामान बदलामुळे शेतीवर होणाऱ्या परिणामांना तोंड देण्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करून शाश्वत शेतीचा नवा मार्ग शोधला जात आहे.




या कार्यक्रमामध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांनी नवउद्योग, संशोधक आणि स्टार्टअप कंपन्यांना महाराष्ट्र शासनासोबत सहकार्य करण्याचे आणि सहभागी होण्याचे आवाहन केले.

# कलात्मक दिग्दर्शक गुरुदत्त......

अगदी थोड्या काळात ज्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटून हिंदी चित्रपट सृष्टीत आपले नाव अजरामर केले त्या हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते गुरुदत्त यांची पुण्यतिथी

....गुरुदत्त हिंदी चित्रपट सृष्टीत जिवंतपणीच अख्यायिका बनलेले व्यक्तिमत्व. आजही गुरुदत्त यांचे नाव घेतले की आठवतात ते त्यांचे कलात्मक चित्रपट मग ते चौदहवी का चांद असोत की कागज के फूल, सी आय डी असोत की मी. अँड मिसेस ५५ आरपार असोत की प्यासा. त्यांच्या प्रत्येक चित्रपटात आणि चित्रपटातील प्रत्येक दृश्यात कलात्मकता दिसून येते. चित्रपट कलात्मक असूनही त्यांच्या चित्रपटांना प्रेक्षकांची पहिली पसंती मिळत असे म्हणूनच त्यांना कलात्मकता आणि व्यावसायिकता यांच्यात सुवर्णमध्य साध-णारा संवेदनशील निर्माता दिग्दर्शक म्हंटले जाते. वर उल्लेख केलेले सर्व चित्रपट हिंदी चित्रपट सृष्टीतील माईल स्टोन चित्रपट आहेत. आजही फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट मध्ये शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना हे चित्रपट आवर्जून दाखवले जातात. त्यांच्या प्रत्येक चित्रपटाला समीक्षकांची तर पसंती मिळालीच पण प्रेक्षकांनी ही चित्रपट डोक्यावर घेतले. साहिब बिबी और गुलाम या चित्रपटाला तर राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. आजही ती तितकीच लोकप्रिय आहेत मग ती बाजी चित्रपटातील आज की रात पिया दिल ना तोडो... जाल मधील ये रात ये चांदणी फिर कहा.... आरपार मधील बाबूजी धीरे चलना..... सी आय डी मधील तर सर्वच गाणी लोकप्रिय झालीत मग ती आँखो ही आँखो मे इशारा हो गया... लेके पहला पहला प्यार... ये दिल है मुश्कील जिना यहा... मी अँड मिसेस ५५ मधील थंडी हवाये काली घटाये.... प्यासा मधील जाने वो कैसे लोग थे... कागज के फूल मधील वक्त ने किया क्या हसी सितम... चौदहवी का चांद मधील चौदहवी का चांद हो या आफताब हो.. साहिब बिबी और गुलाम मधील ना जाओ सय्या छुडाके बैया..... त्यांच्या चित्रपटातील सर्व गाणी सुमधुर होती म्हणूनच ती गाणी लोकप्रिय ठरली. केवळ गाणीच नाही तर त्यांच्या चित्रपटातील संवादही लोकप्रिय झाले. गुरुदत्त यांच्यावर बंगाली साहित्य आणि विचारांचा मोठा प्रभाव होता हाच प्रभाव त्यांच्या चित्रपटातूनही दिसून येतो.

९ जुलै १९२५ रोजी बंगलोर येथे त्यांचा जन्म झाला त्यांचे खरे नाव वसंत शिवकुमार पदुकोण असे होते. जन्म जरी बंगलोर येथे झाला तरी त्यांचे बालपण पश्चिम बंगालमधील भवानीपूर येथे गेले. आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्यांनी मॅट्रिक पर्यंतच शिक्षण घेतले. नंतर ते पुण्यात आले. तिथे प्रसिद्ध फिल्म कंपनी प्रभात मध्ये त्यांना असिस्टंट दिग्दर्शक व नृत्य दिग्दर्शक म्हणून नोकरी मिळाली. तिथेच त्यांची ओळख देव आनंद यांच्यासोबत झाली ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले आणि पुढे ही मैत्री इतकी घट्ट झाली की दोघांनीही एकमेकांना आपल्या चित्रपटात संधी दिली. देव आनंद यांच्या बाजी आणि जाल या चित्रपटाचे दिग्दर्शन गुरुदत्त यांनी केले तर गुरुदत्त यांनी निर्माण केलेल्या सी आय डी या चित्रपटात देव आनंद हे नायक होते . गुरुदत्त हे एक महान चित्रपट कर्मी होते त्यासोबतच ते एक माणूस ही होते. इतर माणसांप्रमाणे त्यांच्यातही गुणदोष होते. बाजी या चित्रपटाच्या सेटवर गुरुदत्त यांची गीता रॉय या बंगाली अभिनेत्रीशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. त्यांना तीन मुलेही झाली पण दोघांचे एकमेकांशी पटले नाही दोघात किरकोळ कारणांमुळे वाद होऊ लागला. दररोज होणारा वाद टाळण्यासाठी गीता रॉय मुलांना घेऊन घराबाहेर पडल्या, वेगळ्या राहू लागल्या याच दरम्यान गुरुदत्त हे वहिदा रहेमान यांच्या जवळ गेल्याचे बोलले गेले मात्र वहिदाजींना आपले करियर करायचे असल्याने त्या या नात्यात अडकल्या नाहीत. या सर्व कारणांनी गुरुदत्त कमालीच्या डिप्रेशनमध्ये गेले आणि तो काळा दिवस उजाडला. ९ ऑक्टोबर १९६४ रोजी पत्नी गीता रॉय मुलांसह त्यांना भेटायला येणार होत्या मात्र त्या आल्या नाहीत त्यामुळे चिडलेल्या गुरुदत्त यांनी रागाचा भरात झोपेच्या गोळ्या खाल्ल्या. त्यांना हॉस्पिटलमध्ये ऍडमिट करण्यात आले पण दुसऱ्याच दिवशी म्हणजे १० ऑक्टोबर १९६४ रोजी त्यांची प्राणज्योत माळव-ली.

अवघ्या ३९ वर्षाचे आयुष्य त्यांना लाभले. त्यांच्या निधनानंतर प्रख्यात शायर कैफी आझमी यांनी लिहिलंय

रहनेको सदा दहरमे आता नही कोई
तुम जैसे गये वैसे जाता नहीं कोई
एक बार तो मौत भी घबरा गई होगी
यू मौत को सिने से लगाता नहीं कोई...

# 'नकोशी' मुलगी 'सुंभ जळाला, तरी पीळ कायम'



सुंभ जळाला, तरी पीळ कायम' अशी मराठीत जी म्हण आहे, ती आज आपल्या समाजाला तंतोतंत लागू पडते. गोष्टी कालानुरूप फार वेगा-ने बदलत असतात. बदलत्या वास्तवाची जाणीव प्रत्येकालाच असते. सभोवतालच्या वास्तवा-नुसार बदलायला हवं; त्याशिवाय तरुणोपाय नाही याचंही भान असतं. पण, माणूस बदलाला सहजासहजी तयार होत नाही. परंपरा आणि संस्कारातून आलेल्या समजुतींबाबत तर हे जडत्व खूपच असतं. कालानुरूप मांडल्या जाणाऱ्या प्रागतिक विचारांना सुरुवा-तीला विरोधच असतो. त्यातली अपरिहार्यता लक्षात आल्यानंतर जेवढं आवश्यक, भौतिक जगण्याला उपयोगी - तेवढंच स्वीकारलं जातं. केवळ तेवढ्या स्वीकारावरून स्वतःचं प्रागतिक म्हणून समर्थनही केलं जातं. पण, ते मुळातून नसल्याने, जे स्वीकारलं ते वरवरचं असल्याने त्याचा लाभ तर होत नाहीच; पण फरपट मात्र होते. स्त्रीभ्रूण हत्येविरोधात सरकारी पातळीवर बऱ्याच मोहिमा झाल्या. स्त्री सुधारकांनी वेगवेगळ्या पातळीवर प्रबोधन करून झालं. त्याचे धोके सांगून झाले. ज्या कारणासाठी कुटुंबाला मुलगी ओझं वाटते, ती कारणं संपवण्यासाठी सरकारने विविध योजना आखल्या. महाराष्ट्रासारख्या राज्यात या योजनांची अंमलबजावणी शंभर टक्के दिसते. कागदावर लाभार्थींच्या याद्याही आ-हेत. पण, त्या योजनांचा लाभ घेतल्यानंतर मानसिकतेत किती फरक झाला? तर, अगदी जेमतेम. मग त्या योजनांचा उपयोग काय झाला? ज्या समाजसुधारकांनी समाजप्रबोधनासाठी आयुष्य वेचलं, सरकारने मोहिमांच्या प्रसिद्धीवर कोट्यवधींचा खर्च केला, प्रत्येक योजनेतूनही कोट्यवधींचा लाभ दिला, त्याचा उपयोग काय झाला? सगळं पालथ्या घड्यावर पाणी?

मुली शिकल्या, त्या स्वावलंबी झाल्या, शिक्षणाने त्यांच्या आणि कुटुंबीयांच्या बौद्धिकतेत-मानसिकतेत फरक पडला, तर त्याचा लाभ स्त्रियांकडे बघण्याच्या दृष्टिकोनात होईल. 'नकोशी' मुलगी 'हवीशी' होईल. 'मुलगी शिकली, प्रगती झाली'सारख्या घोषणांनी संपूर्ण राज्यात त्यासाठीच भिंती रंगवल्या होत्या. प्रसिद्धी माध्यमांतून जाहिराती दिल्या गेल्या होत्या. मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावं, 'मुलाचं, की घरातल्या मुलीचं शिक्षण?' यात मुलींचं शिक्षण बाजूला पडू नये, यासाठी केंद्र सरकारने' बेटी बचाव-बेटी पढाव' ही महत्त्वाकांक्षी योजना आखली. त्यासाठी चांगल्या निधीची तरतूद केली. योज-नेचा निधी केंद्रातून राज्यात, राज्यातून जिल्ह्याजिल्ह्यांत गेला, पण त्यानंतर तिथे तो खर्चच झाला नाही, अशी माहिती केंद्र सरकारच्या महिला आणि बालविकास विभागाच्या एका अहवालात देण्यात आली आहे. अहवालात म्हटलं आहे, की योजनेच्या गेल्या अकरा वर्षांत मूळ तरतुदीच्या एक तृतीयांश निधीही कधी खर्च झाला नाही! सन २०२४-२५ मध्येही ३१ डिसेंबरपर्यंत एकूण योजनेच्या फक्त १३ टक्के निधीच खर्च झाला आहे!! हा आतापर्यंतचा सर्वात कमी खर्च आहे.

देशाच्या तुलनेत महाराष्ट्रात परिस्थिती बरी आहे. पण, ज्या राज्यात याची सर्वाधिक गरज आहे, तिथेच अगदी खालच्या स्तरावर उदासीनता दिसते आहे. अगदी खालच्या स्तरावर अस-लेली उदासीनता ही प्रशासकीय पातळीवरची उदासीनता असते. या स्तरावरील अधिकारी आणि कर्मचारी वर्ग म्हणजे समाजाच्या पारंपरिक मानसिकतेचं प्रतीक असतो.

त्यांच्या मानसिकतेवर आणि कार्यक्षमतेवरच कोणत्याही योजनेची अंमलबजावणी आणि यश अवलंबून असतं. त्यामुळे, योजनेच्या माध्यमातून समाजात कोणताही बदल घडवायचा असतो, तेव्हा या पातळीवरच्या प्रशासनिक यंत्रणेचं प्रबोधन, संवेदनीकरण फार महत्त्वाचं असतं. या योजनेच्या अंमलबजावणीत राष्ट्रीय पातळीवर कुठे कमतरता दिसते आहे, ते शोधून तिथल्या कर्मचारी वर्गाचे प्रशिक्षण वर्ग तातडीने आयोजित केले पाहिजे. त्यांच्या दृष्टिकोनात बदल होण-ार नाही, तोपर्यंत योजनेच्या अंमलबजावणीला गती येणार नाही. गती येणार नाही, तोपर्यंत तिची प्रभावी अंमलबजावणी होणार नाही. अंमलबजावणी झालीच नाही, तर मुलींच्या शिक्षणाला, तिच्या आत्मनिर्भर होण्याला जो रेटा द्यायचा आहे, तो मिळणार नाही. हा रेटा प्रत्यक्ष कुटुंबापर्यंत पोहोचलाच नाही, तर मुलगी 'नकोशी'च राहील आणि त्यामुळे स्त्रीभ्रूणहत्या होतच रा-हतील. त्यातून समाजाचा तोल बिघडेल आणि नवे गंभीर प्रश्न आणखी गंभीर होत जातील.

हुंडा प्रथा ही मुलगी 'नकोशी' होण्याचं एक महत्त्वाचं कारण आहे, हे लक्षात घेऊन हुंडाविरोधी चळवळी उभ्या राहिल्या. शाळा पातळीपर्यंत त्याबाबतचं प्रबोधन केलं गेलं. हुंडा प्रथेला प्रतिबंध करणारे कायदेही केले गेले. विवाहानंतर हुंड्यासाठी त्रास दिला गेला, तर त्यासाठीही कडक कायदा केला गेला. विवाहित तरुणी ज्या कोणाचं आरोपी म्हणून नांव घेईल, त्याच्या थेट तुरुंगवारीची तरतूद कायद्यात केली गेली. अनेक घटनांत कुटुंबच्या कुटुंब तुरुंगाची हवा खाऊन आली. त्याने हुंडाबळीच्या पूर्वीच्या संख्येत घट झाली. पण, थोडीशीच. त्या प्रथेचं निर्मूलन अजूनही झालेलं नाही. मुंबईसारख्या पुढारलेल्या शहरात तर हुंड्याबाबतच्या तक्रारीत ४०९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. हुंड्यासाठी सासरी शारीरिक व मानसिक छळ होत असल्याच्या २०२२ मध्ये जेवढ्या तक्रारी पोलिसांत नोंदवल्या गेल्या, त्यात २०२३ मध्ये ४०९ टक्क्यांनी वाढ आहे! अपहरणाच्या गुन्ह्यांतही देशात दिल्ली खालोखाल मुंबई दुसऱ्या क्रमांकावर आहे.

बलात्काराच्या गुन्ह्यांत मुंबईचा क्रमांक देशात तिसरा आहे. पहिला क्रमांक दिल्लीचा आणि दुसरा जयपूरचा आहे. महिलांची प्रतिष्ठा, सुरक्षितता आणि त्यांचं उन्नयन यासाठी देशपातळीवर प्राधान्याने मोहीम उघडण्याची गरज आहे. मुंबईकरांनीच त्यासाठी पुढाकार घेणं योग्य ठरेल.

# सर्वोच्च न्यायालयाच्या प्रतिष्ठेवर आघात हा लोकशाहीवरील हल्ला आहे - ॲड. शंकर चव्हाण





**मुंबई :** अलीकडे सर्वोच्च न्यायालयाविरुद्ध झालेल्या अत्यंत दुर्दैवी आणि निंदनीय वक्तव्यांवर व कृतींवर देशभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आ-हेत. अशा पार्श्वभूमीवर बॉम्बे हायकोर्टचे वकील ॲड. शंकर चव्हाण यांनी आपल्या वक्तव्यात या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवत न्यायसंस्थेच्या प्रतिष्ठेचे रक्षण करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची असल्याचे सांगितले आहे.

ॲड. चव्हाण म्हणाले, सर्वोच्च न्यायालय हे देशाच्या लोकशाहीचे शेवटचे आणि सर्वोच्च संरक्षणकवच आहे. जेव्हा कोणीतरी धर्माच्या नावाखा-ली किंवा राजकीय स्वार्थासाठी या संस्थेवर प्रहार करतो, तेव्हा तो थेट संविधान आणि लोकशाही मूल्यांवर हल्ला करतो. न्यायसंस्थेच्या प्रतिष्ठेवर घाला घालण्याचा कोणालाही अधिकार नाही.

त्यांनी पुढे सांगितले की, सर्वोच्च न्यायालय केवळ कायद्याचे पालन करत नाही, तर नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करते. आपली न्यायसंस्था स्वतंत्र आहे आणि तिची ही स्वायत्तता हीच आपल्या लोकशाहीची खरी ओळख आहे. जर समाजातील काही घटक या संस्थेवर अविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करत अस-तील, तर तो प्रत्येक जबाबदार नागरिकाने आणि वकिलांनी एकत्र येऊन रोखला पाहिजे, असे चव्हाण यांनी स्पष्ट केले.

ॲड. चव्हाण यांनी सर्व बार असोसिएशन्स आणि बार कौन्सिल्सना आवाहन केले की त्यांनी एकत्रितपणे या प्रकारच्या घटनांविरोधात ठाम भूमिका घ्यावी. न्यायसंस्थेचा अपमान करणाऱ्या कोणत्याही कृत्याला माफी दिली जाऊ नये. आपण वकील म्हणून, नागरिक म्हणून, आणि देशभक्त म्हणून या घटनांचा निषेध केला पाहिजे. कारण हे केवळ न्यायव्यवस्थेवरचे नव्हे, तर संविधानावरचे आणि देशाच्या आत्म्यावरचे आघात आहेत, असे त्यांनी नमूद केले.

त्यांनी सांगितले की, भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात धर्म, जात, पंथ यांच्या आधारे विभाजन नव्हे तर एकता हवी आहे. धर्माच्या ना-वाखाली न्यायसंस्थेवर हल्ले करून कोणालाच दीर्घकालीन फायदाच होणार नाही. उलट अशी कृती देशाची आंतरराष्ट्रीय प्रतिमा मलिन करते आणि न्यायव्यवस्थेवरील विश्वास डळमळीत करते, असे त्यांनी सांगितले.

ॲड. शंकर चव्हाण यांनी या घटनेचा निषेध करताना सर्वांनी शांततेच्या आणि कायद्याच्या मार्गाने विरोध नोंदवावा, असे आवाहन केले. आपण भावना आवरल्या पाहिजेत. न्यायसंस्था आपले काम निष्ठेने करत आहे आणि करत राहील. तिच्या विर-ोधात असलेली कोणतीही मोहीम लोकशाहीच्या मुळावर प्रहार करणारी आहे. त्यामुळे समाजाने सजग राहणे हीच काळाची गरज आहे, असे त्यांनी मत व्यक्त केले.

शेवटी ॲड. चव्हाण यांनी सांगितले की, लोकशाही ही फक्त मतदानापुरती मर्यादित नाही, तर ती प्रत्येक नागरिकाच्या वर्तनात आणि जबाबदारीत दिसली पाहिजे. न्यायसंस्थेवर श्रद्धा ठेवणे, तिचे रक्षण करणे आणि तिच्या निर्णयांचा सन्मान करणे हे आपले कर्तव्य आहे.

# शिवसेना कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करून तहसीलदार नवनाथ वगवाड यांना विविध मागण्यांचे दिले निवेदन

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर प्रतिनिधी /सुभान शहा** / शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार बुधवार, दि. ८ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता गंगापूर तहसील कार्यालयासमोर सरकारविरोधात धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व उपजिल्हाप्रमुख कृष्णा पाटील डोणगावकर व लक्ष्मण सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करून सरकारचा निषेध नोंदविला. आंदोलनानंतर तह-सीलदार नवनाथ वगवाड यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की. राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, निवडणूक जाहीरनाम्यातील कर्जमाफीची अंमलबजावणी करावी, तसेच सततच्या पावसामुळे शेती, घरे व शेतजमिनींचे मोठे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत जाहीर करावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या. या प्रसंगी उपजिल्हाप्रमुख अविनाश शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) तर्फे गंगापूर तह-



सील कार्यालयासमोर सरकारविरोधात निदर्शने करण्यात आले. यावेळी तालुकाप्रमुख दिनेश मुथा, शहरप्रमुख भाग्येश गंगवाल, तालुका प्रमुख सुभाष कानडे, अंकुश सुंब, सुभाष भोसले, पांडुरंग कापे, पोपट गाढेकर, रा-वसाहेब टेके, कारभारी दुबिले, दादा जगताप, विष्णु पोटे, बाबूलाल अल्लाबक्ष, अयुब शेख, महेश लिंगायत, नवनाथ भुसारे, लक्ष्मण साध्ये, प्रवीण सोनवणे, सुरेंद्र सूर्यवंशी, ज्ञा-नेश्वर कर्डिले, गोकुळ ठोंबरे, अर्चना सोमासे, रुक्मिणी राजपूत, भानुदास पवार, राजेंद्र गावंडे आदींसह शिवसेना, युवासेना, महिला आघाडी व अंधीकृत संघटनांचे मोठ्या संख्येने पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे विविध मागण्यांसाठी अर्धापूर येथे भव्य रास्तारोको आंदोलन



**आत्ताच एक्सप्रेस**
**अर्धापूर प्रतिनिधी/ उध्दव सरोदे** / महाराष्ट्र राज्यात व विशेष करून मराठवाड्यात महाभयंकर अतिवृष्टीमुळे खरिपांच्या पिकांची खूप मोठी नासाडी झाली असून शेतकऱ्यांना तातडीने कर्जमाफी, हेक्टरी एक लाखांची मदत मदत, विम्यांची रक्कम त्वरित द्यावी यांसह विविध मागण्यांसाठी शहरातील बसवेश्वर चौकात सोमवारी (ता.सहा) रास्तारोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे काही काळासाठी वाहतूक ठप्प झाली होती. शेतकऱ्यांच्या घोषणांनी सर्व परिसर दणाणून गेला होता.अर्धापूर तालुक्यात झालेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे खरिपातील सर्व पिकें पाण्यात वाहून गेली आहेत.पिकांच्या नुकसानामुळे शेतकऱ्यांना खूप मोठा आर्थिक फटका बसला असून नैसर्गिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची गरज असून तालुक्यातील संतप्त शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन करुन आपला आक्रोश व्यक्त केला.

शेतकऱ्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना दिले असून यामध्ये पुढील प्रमाणे मागण्या करण्यात आल्या आ-हेत.हेक्टरी एक लाखांची मदत देणे,केळी व सोयाबीन पिकांचा विमा मंजूर करण्यात यावा, ज्या पशुपालकांचे जनावरे पाण्यात वाहून गेली आहेत त्यांना ७० हजारांची मदत देण्यात यावी, शैक्षणिक शुल्क माफ करण्यात यावा, पडझड झालेल्या घरांसाठी एक लाखांची मदत देण्यात यावी, शेतमालाला वाढीव हमीभाव देण्यात यावा,खरडुन गेलेल्या शेतीच्या दुरुस्तीसाठी हेक्टरी पन्नास हजार मदत देण्यात यावी यांसह इतर अनेक मागण्या करण्यात आल्या आहेत व त्या लवकरात लवकर पूर्ण नाही केल्या तर केंद्र व राज्य सरकार विरूद्ध शेतकरी यापेक्षाही जास्त रूद्ररूप धारण करून मोर्चे,आंदोलने, जाळपोळ,आमरण उपोषण,दंगल आदि प्रकार व घटना करतील अशी माहिती शेतकऱ्यांनी दिली.

## डव्हान्टेज महा.एक्स्पो-२०२६ च्या पूर्वतयारीचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर/** डव्हान्टेज महा.एक्स्पो-२०२६ या दि.८ ते ११ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या नियोजित उद्योग प्रदर्शनाच्या पूर्वतयारीचा जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज आढावा घेतला. आढावा बैठकीस जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, मनपा चे अपर आयुक्त रणजीत पाटील, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, उद्योग सहसंचालक स्वप्निल राठोड,ऑरिक सिटीचे शैलेश धाबेकर, अरुण दुबे, कार्यकारी अभियंता आर.डी. गिरी, प्रदर्शनाचे समन्वयक अनिल पाटील तसेच मसिआ व अन्य संस्थांचे पदाधिकारी आदी उपस्थित होते. येथील मसिआ व अन्य औद्योगिक संघटना, संस्थांच्या वतीने तसेच महाराष्ट्र शासन, सुक्ष्म, लघु एवं मध्यम उद्योग, ऑरिक सिटी, तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्य सहयोगातून डव्हान्टेज महाराष्ट्र एक्स्पो-२०२६ या औद्योगिक प्रदर्शनाचे आयोजन ऑरिक सिटी येथे दि.८ ते ११ जानेवारी २०२६ या कालावधीत केले जाणार आहे. या औद्योगिक प्रदर्शनात देशातील तसेच विदेशातील अनेक उद्योजक आपल्या उत्पादनांचे प्रदर्शन लावणार आहेत. तसेच येथे सामंजस्य करार, चर्चासत्रे आदी होणार आहेत. बैठकीत माहिती देण्यात आली की, हे प्रदर्शन ऑरिक सिटीच्या आवारात २७.५ एकर क्षेत्रात भव्य आयोजीत होणार आहे. त्यात १५०० स्टॉल्स लावण्यात येणार आहेत. त्यात देशविदेशातील उद्योजक येणार आहेत. तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याची विशेष ओळख दर्शविणारे , येथील संस्कृती, कला यांचे दर्शन घडविणारे स्टॉल्स लावले जाणार आहेत. जेणेकरुन येणाऱ्या बाहेरच्या उद्योग प्रतिनिधींना त्याची ओळख होईल. त्याच प्रमाणे येथे उत्पादन, ऑटोमोबाईल, कृषी, टेक्सटाईल, फुड, इलेक्ट्रिक, इलेक्ट्रॉनिक, पर्यटन, आतिथ्य उद्योग अशा विविध उद्योग क्षेत्रातील प्रदर्शने लावली जाणार आहेत. आयोजनाच्या ठिकाणी येण्या जाण्याचे मार्ग, वैद्यकीय सुविधा, रुग्ण वाहिका, अग्निशमन वाहने, इंटरनेट सुविधा, नियंत्रण कक्ष , हेल्पलाईन सुविधा इ. बाबत प्रशासनाच्या सहयोगाने उपलब्धता करण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सर्व संबंधित विभागांना निर्देशित केले.

## संविधान जाणीवजागृती उपक्रमांचे आयोजन करा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी




**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर/** संविधानाविषयी विद्यार्थीदशेपासूनच ज्ञान व्हावे यासाठी संविधान जाणीव जागृती उपक्रमांचे आयोजन करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामीयांनी आज जिल्हा दक्षता समितीच्या बैठकीत दिले.

जिल्हा दक्षता समितीची बैठक आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

बैठकीसाठी सामान्य प्रशासन विभागाच्या उपजिल्हाधिकारी संगीता राठोड, सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त रवींद्र शिंदे, पोलीस उपायुक्त पंकज अतुलकर, पोलीस उपायुक्त गौतम पातारे, सरकारी वकील मोना राऊत, पोलीस निरीक्षक राजेश घोळवे तसेच पोलीस निरीक्षक आशा भांडे आणि समितीचे सदस्य उपस्थित होते.

अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणाची माहिती घेऊन त्यात शिक्षा झालेली प्रकरणे, निर्दोष प्रकरणे याबाबत पोलीस विभागांशी चर्चा करून प्रकरण निकाली काढावे,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी बैठकीत दिले. याच कायद्या अंतर्गत अर्थसाह्यासाठी प्रलंबित प्रकरणेही लवकरात लवकर निकाली काढावी,असेही निर्देश त्यांनी दिले.

सामाजिक न्याय विभाग अंतर्गत संविधानाची उद्देशिका प्रत्येक कार्यालयात लावण्याचा शासन निर्णय असून त्याची अंमलबजावणी करावी. संविधानाविषयी जाणीव जागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करावे.

विद्यार्थ्यांना याबाबत विविध उपक्रमांद्वारे माहिती द्यावी. दिवाळीनंतर शाळा सुरू झाल्यावर शाळेमध्ये हस्ताक्षर स्पर्धेच्या माध्यमातून संविधानाची उद्देशिका विद्यार्थ्यांच्या लेखनातून व त्यांच्या वाचनातून गेली पाहिजे. यासाठी विविध उपक्रमाचे आयोजन शिक्षण विभागाच्या समन्वयाने करावे.

सामाजिक सलोखा आणि एकात्मता अबाधित राहावी यासाठी सामाजिक न्याय विभाग, पोलीस प्रशासन आणि इतर विभागांनाही योग्य त्या खबरदारी घेऊन विविध कायद्यांच्या अंमलबजावणीकडे कटाक्षाने लक्ष द्यावे,असेही जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले.

## संक्षिप्त

## पैठण नगराध्यक्ष निवडणुकीत यंदाही कमळ फुलेल!



**आत्ताच एक्सप्रेस**
**पैठण प्रतिनिधी/बबन उदावंत** / आगामी पैठण नगराध्यक्ष निवडणुकीसाठी पोषक असे वातावरण आहे पैठण न.प. पदाधिकारी व कार्यकर्ते संपूर्ण ताकदीनिशी कामाला लागलेले आहेत, असे दिसून येते की आपसातील विरोधक टेन्शन मध्ये असून यंदाही पैठण नगर पालिकेवर कोणत्या पक्ष्याचा झेंडा फडकनार,पैठण नगराध्यक्ष निवडणुकीत नगराध्यक्ष महिलांसाठी राखीव असल्यामुळे बाजी कोण मारणार असा जनतेसमोर असून पैठण न.प. निवडणुकीची जोरदार मोर्चेबांधणी पैठण शहराच्या प्रभागा - प्रभागांत सुरू झाली आहे. त्यापार्श्वभूमीवर आपली 'खास मुलाखतीत' करतांना पैठण नगरीचे माजी नगराध्यक्ष, सूरज लोळगे 'आत्ताच एक्सप्रेस' शी बोलतानी सांगितलं की , २०१६ च्या पैठण नगराध्यक्ष निवडणुकीत पैठणकरांनी भाजपवर जो विश्वास दाखविला होता तो विस्मरणीय असून विरोधक भाजपचा ऐतिहासिक विजय अजूनही विसरलेले नाहीत, नगराध्यक्ष काळात पैठण नगरीचा संपूर्ण कायापालट केला, असे स्पष्ट सांगून माजी नगराध्यक्ष सूरज लोळगे पुढे म्हणाले, भाजपशासित पैठण नगर पालिकेच्या कामांमुळे पैठणकर हे खुश असून आगामी पैठण नगराध्यक्ष निवडणुकीसाठी भाजपला शहरभर पोषक वातावरण आहे. पैठणचे भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते मात्र गाफील न राहता आगामी पैठण न.प. निवडणुकीसाठी जोरदारपणे कामाला लागलेले आहेत. इतर कोणत्याही राजकीय पक्षांत पालिकेवर सत्ता स्थापनेची धमक नाही, असे ठासून सांगत माजी नगराध्यक्ष सूरज लोळगे पुढे म्हणाले, आगामी निवडणूक सुरू पैठण नगराध्यक्ष निवडणुकीत भाजपचाच झेंडा फडकणार असून शहराच्या प्रभागा-प्रभागांत आपली 'चाचपणी' आहे. विरोधकांनी कितीही प्रयत्न केलेत तरीही शहरातील प्रत्येक प्रभागांत भाजपची सत्ता येणार असून पैठण नगराध्यक्ष निवडणुकीत ओन्ली कमळ फुलेल, हे टीकाकारांनी व विरोधकांनी लक्षात घ्यावे..! असा आत्मविश्वास ही पैठण नगरीचे माजी नगराध्यक्ष सूरज लोळगे यांनी आत्ताच एक्सप्रेस शी मुलाखतीत व्यक्त केला.

## तहसील कार्यालयासमोर शिवसेना (उबाठा) पक्षाचे निदर्शने; शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार मदत व सरसकट कर्जमाफीची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**
**खुलताबाद प्रतिनिधी/** खुलताबाद तालुक्यात दुष्काळ आणि अवकाळी पावसामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ दिलासा देण्यासाठी शिवसेना (उबाठा) पक्षाच्या वतीने बुधवारी (ता. ८) खुलताबाद तहसील कार्यालयासमोर आज आंदोलन करण्यात आले.या आंदोलनाचे नेतृत्व तालुका प्रमुख राजु वरकड यांनी केले.

तहसील कार्यालय समोर आंदोलन करून शेतकऱ्यांच्या झालेली नुकसानच्या संदर्भात नायब तहसीलदार गणेश सावंत यांना निवेदन देण्यात आले दिलेले निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,निवडणुकी दरम्यान राज्य सरकारने शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीचे आश्वासन दिले होते,मात्र तीन अधिवेशने संपून ही या विषयावर कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही. परिणामी, नैसर्गिक आपत्ती, वाढलेला उत्पादन खर्च, महागडी खते-औषधे आणि हमीभावाच्या अभावामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

शेतकऱ्यांना थकबाकी, बँक नोटिसा आणि जप्ती कारवाईमुळे त्रास सहन करावा लागत असून अनेक शेतकरी आत्महत्येचा मार्ग स्वीकारत आहेत, अशी खंतही यावेळी व्यक्त करण्यात आली.

शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत - अतिवृष्टीमुळे झालेल्या पीक नुकसानीसाठी शेतकऱ्यांना हेक्टरी ५०,००० इतकी मदत तात्काळ जाहीर करावी.संपूर्ण कर्जमाफी मराठवाड्यातील सर्व शेतकऱ्यांचे थकीत व चालू कर्ज त्वरित माफ करून शेतकऱ्यांना कर्जमुक्त करावे,पीक विमा लाभ तातडीने देणे विमा निकष शिथिल करून पंचनाम्याची प्रक्रिया बाजूला ठेवत विमा रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी, घर व पशुधन नुकसानभरपाई - अतिवृष्टीमुळे घरे व पशुधनाचे नुकसान झालेल्या नागरिकांना तात्काळ आर्थिक मदत देण्यात यावी अश्या मागण्या या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत. या आंदोलना वेळी शिवसेना (उबाठा) कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांना न्याय मिळालाच पाहिजे!, कर्जमाफी जाहीर करा! अशा घोषणा देत सरकार विरोधात तीव्र संताप व्यक्त केला. नायब तहसीलदार गणेश सावंत यांना निवेदन स्विकारत मागण्या शासनाकडे पाठविण्याचे आश्वासन दिले. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख




राजू वरकड शहर प्रमुख विष्णू फुलारे, शंकर काका अधाने विभाग प्रमुख विजय प्रल्हाद चव्हाण उपतालुका प्रमुख दत्ता मालोदे आकाश हिवर्डे. साईनाथ मातकर विधानसभा संघटक गणेशा आधाने. रायसिंग दादा चव्हाण माजी तालुकाप्रमुख कारभारी जाधव बाळू खुटे, संदीप गायकवाड, सुनील भोसले, प्रकाश जाधव, मुक्तेश्वर खंडागळे, यांचे सह मोठ्या संख्येने पदाधिकारी व तालुकेभरातील शेतकरी बांधव उपस्थित होते.

## सैन्यदलात अधिकारी होण्यासाठी मोफत पूर्व प्रशिक्षण

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर/** भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदासाठी भरती होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी मोफत पूर्व प्रशिक्षण देण्यात येते. शासनाच्या छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे हे मोफत प्रशिक्षण दि.३ ते १२ नोव्हेंबर या दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. या कोर्सदरम्यान प्रशिक्षणार्थ्यांसाठी निवास, भोजन व प्रशिक्षणाची नि:शुल्क सोय करण्यात आली आहे. जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी दि.३१ ऑक्टोंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात मुलाखतीस उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मुलाखतीस येताना उमेदवारांनी Department of Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या वेबसाईटवरून SSB - ६२ कोर्ससाठी प्रवेशपत्र व परिशिष्टांची प्रिंट घेऊन पूर्ण भरून आणणे आवश्यक आहे. पात्रता अटींपैकी कोणतीही एक आवश्यक -CDSE (UPSC) अथवा ND- (UPSC) परीक्षा पास होऊन SSB मुलाखतीस पात्रता, NCC 'इ' ग्रेडसह गट मुख्यालयाकडून डडइ साठी शिफारस, टेक्निकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी डडइ मुलाखतीचे कॉल लेटर, युनिव्हर्सिटी एंट्री स्कीमसाठी डडइ कॉल लेटर किंवा शिफारस यादीतील नाव आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांच्या training.petenashikgmail.com या ई-मेलवर किंवा दूरध्वनी क्रमांक ०२५३-२४५१०३२ तसेच व्हॉट्सॲप क्रमांक ९१५६०७३३०६ वर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

## इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या शिष्यवृत्ती योजना ऑनलाईन पद्धतीने राबविणार

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर/** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राज्यातील विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना ऑनलाईन पद्धतीने (Mahadbt Portal) राबविण्यात येणार आहे,असे सहायक संचालक दत्तात्रय वाघ यांनी कळविले आहे.

**याअंतर्गत खालीलप्रमाणे योजना राबविण्यात येणार आहेत.**

इ.८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या विजाभज व विमाप्र मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदाने विजाभज विमाप्र, माध्यमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या विजाभज, विमाप्र विद्यार्थ्यांना शिक्षण फी, परीक्षा फी प्रदान करणे, इयत्ती ५ वी ते ७ वी मध्ये शिकत असणाऱ्या इतर मागास प्रवर्गातील मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती लागू करणे, इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या इतर मागास प्रवर्गातील मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना लागू करणे, इयत्ता १ ली ते १० वी मध्ये शिकत असणाऱ्या डीएनटी इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती केंद्र पुरस्कृत योजना.

या सर्व योजना महाडीबीटी प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज प्रक्रियेत आणण्यात येत आहेत. महाडीबीटी पोर्टलवर https://permatric.mahait.org/login/login शाळेचे मुख्याध्यापक आपल्या यूजर आयडी व पासवर्डद्वारे लॉगइन करून,शाळेचे प्रोफाईल अद्ययावत करावे (मुख्याध्यापक व लिपिकांची माहिती समाविष्ट), विद्यार्थ्यांची वैयक्तिक व शैक्षणिक माहिती अद्ययावत करावी. विद्यार्थी पात्र असलेल्या योजनेसाठी अर्ज नोंदणी करावी किंवा योजना लागू करावी, असे इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक दत्तात्रय वाघ यांनी आवाहन केले आहे.

## ऐन सनासूदीच्या महूर्तावर कन्नड नगरीत तीव्र पाणी टंचाई...

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड प्रतिनिधी/ उदय कुलकर्णी /** धरण उषासी तर कोरड घशासी आशा दुहिरी संकटात सद्या कन्नड वासीय सापडले आहे. तुडुंब भरलेले धरण उषासी तर कोरड घशासी अशी अवस्था सद्या या कन्नड नगरीतील नागरिकांची झाली आहे.तालुक्यात झालेली अतिवृष्टी त्यामुळे तुडुंब भरलेली धरणे जिकडे तिकडे पाणिच पाणी झालेले असतांनाही हरित कन्नड नागरीतील नगर परिषदेचा चाललेला गलथान कारभार अजूनही जशास तसा चालू आहे. रोजी सर्वत्र सनासूदीचे दिवस चालू आहे. दहा बारा दिवसावर दीपावलीचा सन येऊन ठेपला आहे.शहरातील प्रत्येक घरी साफसफाईचे कामे चालू आहे.पण नळास पाणीच नाही. दुसरीकडे शहरास पाणी पुरवठा करणारा अंबाडी प्रकल्प ओहोरफ्लो ओसोंडून होऊन वाहत आहे. इतके सर्व असतांनाही केवळ या न.परिषदेच्या गलथान कारभारामुळे ऐन सनसुधीच्या काळत शहर वासियांना विशेष करून महिला वर्गास आपल्या घरांची स्वच्छता करणेसाठी पाणी मिळत नाही. हिच खरी या हरित कन्नड न.परिषदेच्या प्रशासकीय कामाची शोकांतिका आहे .या चाललेल्या बेभरोसे कारभारा बाबत विशेष करून महिला वर्गात तीव्र संतापाची लाट उसळल्याची दिसून येत आहे.




## लहु प्रहार संघटनेचे तहसील कार्यालयावर आंदोलन मातंग-नवबौद्धांना जागेचा मालकी हक्क व आरक्षण उपवर्गीकरणाची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**
**खुलताबाद प्रतिनिधी /** खुलताबाद शहरातील लहुजी नगर,बजरंग चौक आणि मोठी आळी येथे मागील ४० ते ४५ वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या मातंग व नवबौद्ध बांधवांना जागेचा मालकी हक्क मिळावा तसेच अनुसूचित जातींचे आरक्षण उपवर्गीकरण तात्काळ करण्यात यावे या प्रमुख मागण्यांसाठी लहु प्रहार संघटनेच्या वतीने बुधवार (८ ऑक्टोबर) रोजी तहसील कार्यालया समोर भव्य आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनाचे नेतृत्व महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष संतोष पवार,राज्य कार्याध्यक्ष नितीन आव्हाड, राहुल घोरपडे तालुका अध्यक्ष संतोष काळे,मच्छिंद्र बहिलम, कैलास भालेराव, अशोक काळे,ईश्वर काळे यांनी केले.तसेच मयत राणी घोरपडे यांचे वडील सोमनाथ घोरपडे ही या आंदोलनात उपस्थित होते.संघटनेने तहसीलदारांना सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, खुलताबाद शहरातील लहुजी नगर, बजरंग चौक आणि मोठी आळी येथील मातंग व नवबौद्ध समाज बांधवांना आज पर्यंत शासकीय घरकुल किंवा अन्य शासकीय योजनांचा लाभ मिळालेला नाही.

जागेचा मालकी हक्क नसल्याने नागरिकांना विविध योजनां पासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे या नागरिकांना निवासी जागेचा मालकी हक्क तात्काळ देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. तसेच सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाबाबत दिलेला ऐतिहासिक निकाल महाराष्ट्रात अद्याप लागू करण्यात आलेला नाही, याबद्दल संघटनेने नाराजी व्यक्त केली. न्या. अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या समितीला वारंवार मुदतवाढ देण्यात येत असून, ही मुदतवाढ रद्द करून अहवाल तात्काळ स्वीकारावा आणि राज्यात आरक्षण उपवर्गीकरणाची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली.या चबरोबर संघटनेने राणी घोरपडे मृत्यू प्रकरणी बी.एन.एस. कलम १०५ आणि ॲट्रॉसिटी कायदा कलम ३(२)(ीं) समाविष्ट करण्यात यावे, क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज आयोगाच्या ६८ शिफारशीवरील शासन निर्णय तत्काळ पारित करण्यात यावा, तसेच अण्णाभाऊ साठे रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिटयूट ला स्वतंत्र निधी देऊन सर्व प्रशिक्षण व फेलोशिप योजना सुरू कराव्यात, अशा मागण्या निवेदनात नमूद आहेत.या आंदोलनात मोठ्या संख्येने समाज बांधव सहभागी झाले होते. तहसीलदारांनी संघटनेचे निवेदन स्विकारून योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.



## विभागीय लोकशाही दिनाचे १३ ऑक्टोबर रोजी आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर/** विभागीय स्तरावरील लोकशाही दिनाचे ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी १३ ऑक्टोबर, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे. तक्रार करण्यासाठीचे अर्ज विहित मुदतीत नमुना प्रप्रत्र-१ (क) मध्ये दोन प्रतीत आवश्यक त्या कागदपत्रासह विभागीय आयुक्त कार्यालयाचे आवक शाखा प्रमुख (नायब तहसीलदार) यांच्याकडे स्विकारण्यात येणार आहेत. अर्जाच्या दोन प्रती विभागीय लोकशाही दिनाच्या दिवशी विभागीय आयुक्त यांच्याकडे समक्ष पुन्हा सादर कराव्यात. तसेच ज्यांनी यापुर्वीच्या विभागीय स्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेले असतील परंतू त्यांचे प्रकरणात अद्याप कार्यवाही झाली नाही, अशा प्रकरणात त्यांना पुन्हा अर्ज देता येणार नाही. जिल्हास्तरावरील लोकशाही दिन कार्यक्रमात ज्या प्रश्नांची सोडवणूक होवू शकली नाही किंवा या प्रश्नाबाबत जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये तक्रारदाराचे समाधान झाले नाही, असे सर्व प्रश्न विभागीय स्तरावरील लोकशाही दिनामध्ये घेण्यात येणार आहेत, असे विभागीय आयुक्त कार्यालयाने प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## उप जिल्हाधिकारी (अतियात) परतूर जि.जालना यांचे न्यायालयात

**जा.क्र. २०२५ / इनाम / विरासत/कावी-**
**कार्यालय उपजिल्हाधिकारी (अतियात), परतूर**
**दि.०१-१०-२०२५**

### जाहिर प्रगटन

ज्या अर्थी मोहम्मद नासेर मोहम्मद आजम रा. मापेगाव खु. ता. परतूर जि. जालना यांनी दिनांक ०१/०७/२०२२ रोजी या कार्यालयात विहीत नमुन्यात अर्ज सादर करुन त्यांचे नावे विरासत मंजुरीची कार्यवाही करणे करता विनंती केलेली आहे.

अर्जदाराचे आजोबा वलीशाह पिता बुढनशाह यांचे नावे विरासत कार्यवाही झालेली असल्याबाबत अर्जदार यांनी या अर्जात नमुद केलेले आहे. तद्नंतर अर्जदाराचे वडील मोहम्मद आजम मोहम्मद वलीशाह यांनी त्यांचे नावे विरासत मंजुरी करीता तत्कालीन उपविभागीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (अतियात) सेलु यांचे कार्यालयात विरासत मंजुरी अर्ज दाखल केलेला होता. मात्र त्यांचे दिनांक १८/०२/२०२२ रोजी निधन झाले असल्याचे अर्जदाराने त्यांचे अर्जात नमुद केलेले आहे. त्यांचे पश्चात सध्याचे अर्जदार मोहम्मद नासेर मोहम्मद आजम यांनी दिनांक ०१/०७/२०२२ रोजी विरासत मंजुरी करीता या कार्यालयात अर्ज दाखल केलेला आहे.

प्रस्तुत इनाम जमीनीचा तपशिल खालील प्रमाणे अर्जदाराने अर्जात नमुद केलेला आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव | देवस्थानचे नाव | जुना सर्व्हे नंबर व गट नंबर / क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | मापेगाव खु. ता. परतूर | बुर्रानशाह दर्गाह | ३६-३६/१/२<br>०७ हे ४७ आर | |

त्या अर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त नमुद मिळकती बाबत किंवा सदरचे विरासत मंजुरीचे कार्यवाही बाबत जर कोणास काही आक्षेप अगर हरकत असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पासुन ६ आठवडयाच्या आत आपला आक्षेप अगर हरकत लेखी स्वरुपात या कार्यालयात दाखल करावी.

उपरोक्त नमुद मुदतीत कोणाचा आक्षेप अगर हरकती प्राप्त न झाल्यास वरील अर्जदार यांचे नाव त्यांनी विनंती केल्याप्रमाणे उपरोक्त मिळकती बाबत नियमानुसार विरासत मंजुरीची कार्यवाही करण्यात येईल व तद्नंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप अगर हरकत विचारात घेतल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्कयानीशी जाहीर प्रगटन प्रसिध्दी करीता दिलेले आहे.

**स्वाक्षरीत/-**
**(पद्माकर गायकवाड)**
**उपजिल्हाधिकारी (अतियात)**
**परतूर जि. जालना**

१) तहसिलदार, परतूर यांना जाहीर प्रगटनाच्या प्रतीसह देवुन कळविण्यात येते की, सदरहु जाहीर प्रगटनास आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डावरती डकवुन प्रसिध्दी देवुन प्रसिध्दी बाबतचा अहवाल पंचनाम्यासह या कार्यालयास सादर करावा.

२) गट विकास अधिकारी, पं. स. परतूर यांना जाहीर प्रगटनाच्या प्रतीसह देवुन कळविण्यात येते की, सदरहु जाहीर प्रगटनास आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डावरती डकवुन प्रसिध्दी देवुन प्रसिध्दी बाबतचा अहवाल पंचनाम्यासह या कार्यालयास सादर करावा.

३) तलाठी, मौजे मापेगाव खु. यांना जाहीर प्रगटनाच्या प्रतीसह देवुन कळविण्यात येते. की, सदरहु जाहीर प्रगटनास आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डावरती डकवुन प्रसिध्दी देवुन प्रसिध्दी बाबतचा अहवाल पंचनाम्यासह या कार्यालयास सादर करावा.

४) ग्रामसेवक, मौजे मापेगाव खु. यांना जाहीर प्रगटनाच्या प्रतीसह देवुन कळविण्यात येते की, सदरहु जाहीर प्रगटनास आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डावरती डकवुन प्रसिध्दी देवुन प्रसिध्दी बाबतचा अहवाल पंचनाम्यासह या कार्यालयास सादर करावा.

५) या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर

**स्वाक्षरीत/-**
**(पद्माकर गायकवाड)**
**उपजिल्हाधिकारी (अतियात)**
**परतूर जि. जालना**

**जिमाका/जालना/जाहि./६५६/२०२५**

# कठोर परिश्रम आणि कौशल्य हाच यशाचा खरा मंत्र - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी**/ जीवनात कोणत्याही क्षेत्रात यश मिळवायचे असेल तर कठीण परिश्रमाशिवाय ते शक्य नाही. प्रयत्नांची पराकाष्ठा, कौशल्य, प्रामाणिकपणा आणि सातत्याने केलेला प्रयत्न आणि सकारात्मक दृष्टिकोन यामुळेच यशाच्या शिखरावर पोहोचता येते. तरी कठोर परिश्रम आणि कौशल्य हाच यशाचा खरा मंत्र आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या वतीने हुतात्मा जनार्दन मामा नागापूरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना मध्ये उद्योग-सरेखित आणि नवयुगीन अल्पकालीन व्यवसाय अभ्यासक्रमाचा शुभारंभ प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, कौशल्य विकास सहाय्यक आयुक्त गणेश चिमणकर, जिल्हा व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे अतुल केसकर, प्राचार्य रजनी शेळके, लघु उद्योग भारतीचे अध्यक्ष पंकज काष्टीवर, मराठवाडा लघु उद्योग भारतीचे उपाध्यक्ष अविनाश देशपांडे, नरसिंह ट्रेडर्सचे गणेश पवार, संस्था व्यवस्थापक समिती विठ्ठल पवार, श्री काळे, सुधीर कापसे यांची उपस्थिती होती. जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल म्हणाल्या की, बदलत्या औद्योगिक युगात तंत्रज्ञानाचे ज्ञान आत्मसात करण्याचे आणि कौशल्य विकासावर भर देणे आवश्यक आहे.

शासन विविध योजनांच्या माध्यमातून तरुणांना रोजगार व उद्योजकतेसाठी संधी उपलब्ध करून देत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहनही केले.

आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की, सद्यस्थितीत जागतिक स्तरावर आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होत आहे. यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. या कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर विद्यार्थ्यांनी अभ्यास करतानी करायला हवा. महाराष्ट्र शासनाच्या वतीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या बळकटीकरणासाठी अल्प मुदतीचे अभ्यासक्रमाच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत.

ज्यामुळे आगामी काळात जे विद्यार्थी हा अभ्यासक्रम पूर्ण करतील त्यांना निश्चितच रोजगार निर्मितीची संधी मिळेल.



याठिकाणी आज मुंबई येथे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राज्यातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था व तांत्रिक विद्यालय या ठिकाणी कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्या वतीने अल्पकालीन रोजगारक्षम कार्यक्रम यामध्ये उद्योग सरेखित आणि नवयुगीन अल्पकालीन व्यवसाय अभ्यासक्रमाचा शुभारंभ सोहळा पार पडला, याचे थेट प्रक्षेपण उपस्थित सर्व प्रमुख पाहुणे, विद्यार्थी, प्रतिष्ठित नागरीक व अभ्यागतांना दाखविण्यात आले. या कार्यक्रमास अधिकारी-कर्मचारी यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### - लोणी येथे मुख्यमंत्री सामुदायिक आरोग्य शिबिर यशस्वी -आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन

# आरोग्य सेवा हिच खरी ईश्वर सेवा - आमदार बबनराव लोणीकर

**आत्ताच एक्सप्रेस**
**आष्टी प्रतिनिधी /अंगद मुंढे/** परतूर तालुक्यातील लोणी येथे गुरुवार, ९ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री सामुदायिक आरोग्य सेवा शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. माजी मंत्री तथा परतूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांच्या संकल्पनेतून आणि लोणी ग्रामपंचायतेचे सरपंच गजानन लोणीकर यांच्या सहकार्याने, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, लोणी येथे संपन्न झाले. सकाळी १० वाजता आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. जालना जिल्ह्यात यंदा अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे पिण्याच्या पाण्याच्या विहिरी व बोअरमध्ये दूषित पाणी मिसळले. यामुळे सर्दी, खोकला, डेंगू, मलेरिया, टायफॉइड आणि हिवताप यांसारख्या आजारांनी परतूर तालुक्यातील नागरिक त्रस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर आयोजित या शिबिरात सर्व प्रकारच्या आजारांवर मोफत तपासणी आणि उपचार उपलब्ध करून देण्यात आले. रक्तदाब, मधुमेह, डोळ्यांची तपासणी, तसेच डेंगू आणि मलेरियासारख्या साथीच्या आजारांवर विशेष लक्ष देण्यात आले. गरोदर माता, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष काळजी घेण्यात आली. उद्घाटनप्रसंगी बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले, आरोग्य सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे. निरोगी समाज हाच सशक्त समाजाचा पाया आहे. या शिबिरात आढळलेल्या सर्व रुग्णांवर 'महात्मा फुले जन आरोग्य योजना' आणि 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी' यांच्याद्वारे मोफत शस्त्रक्रिया केल्या जातील. यासाठी पुढील महिनाभर विशेष शस्त्रक्रिया सत्र आयोजित केले जाईल. त्यांनी ग्रामस्थांना नियमित आरोग्य तपासणी आणि शिबिराचा पुरेपूर लाभ घेण्याचे आवाहन केले. लोणी ग्रामपंचायतीचे सरपंच गजानन लोणीकर यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व वैद्यकीय कर्मचारी, स्वयंसेवक आणि ग्रामस्थांचे आभार मानले. शिबिरात हजारो ग्रामस्थांनी सहभाग घेऊन मोफत तपासणी आणि औषधांचा लाभ घेतला. निरोगी गाव, सशक्त गाव! या ब्रीदवाक्यासह शिबिर यशस्वीपणे पार पडले. अशा शिबिरांचे लवकरच परतूर विधानसभा मतदार संघात ठीक ठिकाणी आयोजन करण्याचे आश्वासन आमदार बबनराव लोणीकर यांनी दिले. माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री सामुदायिक आरोग्य सेवा शिबिराचे लोणी तालुका परतुर ग्रामपंचायतचे सरपंच गजानन लोणीकर यांनी लोणी तालुका परतूर येथे केले होते. या वेळी जालना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर जयश्री भुसारे, सिव्हिल सर्जन डॉक्टर पाटिल, डॉ. कृष्णा कोरडे - सामान्य वैद्यकीय सेवा - कलावती हॉस्पिटल, जालना, डॉ. धनंजय घुगे - कर्करोग तज्ज्ञ - शासकीय कर्करोग रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर, डॉ. प्रफुल पाटील - दंत चिकित्सा - शासकीय दंत महाविद्यालय, परभणी, डॉ. सतीश मांटे - सामान्य वैद्यकीय - स्थानिक रुग्णालय, मराठवाडा, डॉ. प्रदिप लोखंडे - सामान्य शस्त्रक्रिया - खासगी क्लिनिक, मुंबई/मराठवाडा, डॉ. नितीन भोपळे - सामान्य वैद्यकीय - स्थानिक रुग्णालय, मराठवाडा, डॉ. अजित भांदरगे - सामान्य वैद्यकीय - स्थानिक क्लिनिक, मराठवाडा, डॉ. अनिरुद्ध पाटील - सामान्य वैद्यकीय - डॉ. आनंद पाटील क्लिनिक, लातूर, डॉ. उमेश जाधव - सामान्य वैद्यकीय - स्थानिक रुग्णालय, मराठवाडा/कर्नाटक, डॉ. श्रीराम वानखेडे - सामान्य वैद्यकीय - श्रीराम हॉस्पिटल, डॉ. शालिग्राम जाधव - सामान्य वैद्यकीय - स्थानिक क्लिनिक, उस्मानाबाद/परभणी, डॉ. मधुसूदन तापडिया - वैद्यकीय/शैक्षणिक - शैक्षणिक संस्था, महाराष्ट्र, डॉ. माधुरी कामखेडे - सामान्य वैद्यकीय - स्थानिक क्लिनिक, मराठवाडा, डॉ. सुदर्शन मांडे - सामान्य वैद्यकीय - स्थानिक रुग्णालय, महाराष्ट्र/गुजरात, डॉ. सौरभ बरकुले - सामान्य वैद्यकीय - स्थानिक क्लिनिक, मराठवाडा, डॉ. अपूर्वा सोनी - सामान्य वैद्यकीय/बालरोग - स्थानिक क्लिनिक, महाराष्ट्र/मध्य प्रदेश, डॉ. खान - सामान्य वैद्यकीय - स्थानिक क्लिनिक, मराठवाडा, डॉ. चव्हाण - वैद्यकीय समन्वय - मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष, मुंबई या अतिशय नामांकित डॉक्टरांनी आपल्या संपूर्ण यंत्रणेसह या शिबिरात उपस्थित नागरिकांना सेवा रुजू केली. परतूर भाजपा तालुकाध्यक्ष शत्रगुण कणसे, रमेशराव भापकर, सतीश राव निर्वळ,सुनीलराव लोणीकर, गणेश खवणे, पंजाबराव बोराडे, कैलास बोराडे, अंकुशराव बोबडे, संपत टकले, तुकाराम सोळंके, गजानन लोणीकर, अशोकराव बरकुले, रवी सोळंके, मधुकर मोरे, गजानन लिपणे, कैलास शेळके, आनंद जाधव, सीताराम राठोड, नरेश कांबळे, उद्धव गुंजाळ, कैलास चव्हाण यांच्या सह उपविभागीय अधिकारी डॉक्टर पद्माकर गायकवाड, तहसीलदार डॉक्टर प्रतिभा गोरे, उपविभागीय कृषी अधिकारी राम रोडगे, परतुर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तांगडे यांच्यासह ग्रामसेवक संघटनेचे जालना जिल्हाध्यक्ष डीपी काळे, ग्रामसेवक संघटनेचे परतुर तालुका अध्यक्ष बाबा चव्हाण या बरोबर कोकाटे हदगाव आष्टी श्रीष्टी सातोना या जिल्हा परिषद सर्कल मधील प्रत्येक गावातील सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य, सोसायटी चेअरमन सोसायटी सदस्य, ग्राम विकास अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, कृषी सहाय्यक उपस्थित होते.

# आई-वडील हेच आयुष्याचे खरे आकाश-प्रा. वसंत हंकारे
## आई-बाबा समजून घेताना उपस्थितांच्या डोळ्यात तरळले कृतज्ञतेचे अश्रू

**आत्ताच एक्सप्रेस**
**आष्टी प्रतिनिधी** / आजच्या युगात मुलं-मुली आपल्या आई- वडिलांपासून भावनिकदृष्ट्या दूर जात आहेत. त्यांच्या त्यागाचं, कष्टाचं आणि प्रेमाचं खरं महत्त्व तरुण पिढीला पुन्हा जाणवावं, या उद्देशाने इनरव्हील क्लब ऑफ जालना आणि विक्रम टी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आई- बाप समजून घेताना' या भावनिक आणि हृदयस्पर्शी कार्यक्रमात प्रख्यात वक्ते प्रा. वसंत हंकारे यांच्या प्रभावी सादरीकरणाने उपस्थितांच्या डोळ्यांतून कृतज्ञतेचे अश्रू तरळले. दानकुंवर महिला महाविद्यालयात ७ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मानसोपचार तज्ञ मानसी आयुष नोपानी, भाईश्री रमेशभाई पटेल, उद्योजक भावेश पटेल, दानकूंवर महाविद्यालय समितीचे कोषाध्यक्ष संजय अग्रवाल, पोलीस प्रशिक्षण विद्यालयाचे







प्राचार्य अशोक बनकर, दानकुवर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. जितेंद्र अहिरराव, प्रशासकीय अधिकारी डॉ. विद्या पटवारी तर व्यासपीठावर क्लबच्या अध्यक्षा काजल पटेल, सचिव डॉ. राखी जेथलीया, प्रकल्प प्रमुख सोनाली मानधना, मनीषा गणात्रा यांची उपस्थिती होती.

प्रा. वसंत हंकारे यांनी अत्यंत हळुवार, पण प्रभावी शब्दांत आई-वडिलांनी आपल्या मुलांसाठी केलेल्या त्यागाची जाणीव करून दिली. आई-वडील हे फक्त नातं नाही, ती प्रत्येक मुलाच्या अस्तित्वाची पायरी आहे, असे ते म्हणाले. त्यांच्या बोलण्यातील प्रामाणिक भावना, अनुभवातून आलेली सच्चाई आणि भावनांचा आविष्कार एवढा परिणामकारक होता की, उपस्थित विद्यार्थीनी, पालक आणि शिक्षक यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. या कार्यक्रमात अनेक विद्यार्थिनींनी स्वतःच्या जीवनाचा पुनर्विचार केला.

कार्यक्रमानंतर प्रतिक्रिया देताना उपस्थित मुलींनी सांगितले की, आज आम्ही पहिल्यांदाच आपल्या आई-वडिलांचा खरा अर्थ जाणला. त्यांनी केलेल्या त्यागाचं मूल्य समजलं. प्रा. वसंत हंकारे यांचा हा संवाद म्हणजे आजच्या पिढीसाठी जागृतीचा झंकार होता. प्रास्ताविकपर भाषणात काजल पटेल यांनी या कार्यक्रमाचा उद्देश विशद केला. या कार्यक्रमाला इनरव्हील क्लब ऑफ जालनाच्या सदस्य रचना पित्ती, वर्षा अग्रवाल, कल्पना गोसरानी, छाया हंसोरा, अर्चना काबरा, सुनीता अग्रवाल यांच्यासह अडीच हजारावर मुली, पालक आणि शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक रोडिया यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार डॉ. विद्या पटवारी यांनी मानले.

# परतूर शहरात केलेल्या विकास कामाच्या जोरावर नगराध्यक्ष उमेदवारासह सर्व प्रभागात उमेदवार उभे करणार - मोहन अग्रवाल



**आत्ताच एक्सप्रेस**
**परतुर / प्रतिनिधी**/ परतूर नगरपरिषदेच्या होत असलेल्या आगामी निवडणुका ह्या आम्ही आमच्या पॅनलच्या वतीने नगराध्यक्ष उमेदवारासह शहरातील सर्व २३ जागेवर उमेदवार केलेल्या विकास कामाच्या जोरावर उभे करणार असून सर्व जागेवर निवडणूक लढविण्याची तयारी झालेली आहे, आणि सर्व उमेदवार निवडणूक लढविण्यासाठी सज्ज आहेत. संपूर्ण ताकदीसह सर्व उमेदवार निवडणूक मैदानात उतरणार असून येणाऱ्या काळात परतुर नगर परिषदेवर मोहन अग्रवाल गटाचा झेंडा लागेल असा आत्मविश्वास केलेल्या कामाच्या जोरावर आम्हाला वाटतो. मी कधीही नागरिकांना थापा नाही मारल्या सांगेन त्यांची कामे केलेली आहेत.मी करून दाखवले आहे.तसेच शहरातील सर्व जाती धर्माच्या नागरी वस्त्या मध्ये विविध विकास कामे कुठल्याही सविधानिक पदावर नसताना ५० कोटीची विकास कामे केलेली आहेत जर परतुरच्या जनतेने नगर पालिकेची सत्ता माझ्या हाती दिल्यास परतूर शहर महाराष्ट्रातील विकास कामा बाबत मॉडेल बनवून दाखवेल असे मोहन अग्रवाल यांनी उमेदवारांची झालेल्या बैठकीत आत्मविश्वास व्यक्त केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अँण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813